झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्रमांक -67

जा.क.झोपुप्रा / मुकाअ / परिपत्रक / 2004/416
5 वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई-400 051.
दिनांक 21.12.2004

**विषयः झोपडपट्टी पुनर्वसन योजना**
बंद पडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांबाबत करावयाची कारवाई.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपटटयांच्या विकासासाठी निरनिराळया सह. गृह. संस्था, वास्तुशास्त्रज्ञ, विकासक यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर केले आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात सादर केलेल्या काही योजना एल. ओ. आय मिळाल्यानंतर काही ना काही कारणांमुळे बंद पडलेल्या आहेत. त्यापैकी काही योजना 4 ते 5 वर्षानंतर सुधारीत एल. ओ. आय. घेउन चालू करण्यात आल्याचे आमचे निदर्शनास आले आहे.

तरी वरील परिस्थितीचा विचार करुन या परिपत्रकाद्वारे असे आदेश देण्यात येत आहेत की, अशा बंद पडलेल्या व दफ्तरी दाखल केलेल्या योजनांपैकी डिसेंबर 2001 पूर्वी एल. ओ. आय. मिळालेल्या योजना पुर्नजिवित करण्यात येउ नयेत. अशा योजना परत पुर्नजिवित करावयाच्या असल्यास संबंधित विकासक / वास्तुशास्त्रज्ञ / सह. गृह. संस्था यांना नव्याने पूर्ण प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सादर करणे आवश्यक राहील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रती,

1. मा. मु. का. अ. यांचे स्विय सहाय्यक / झोपुप्रा,
2. मा. सचिव यांचे स्विय सहाय्यक / झोपुप्रा
3. मा. वित्त नियंत्रक यांचे स्विय सहाय्यक / झोपुप्रा